www. sahyandrinews.com

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २२८ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.२९ मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## गेल कंपनी महाराष्ट्रातून का गेली?

# विरोधकांनी सरकारवर खापर न फोडता, सत्यता पडताळून पाहावी–उद्योग मंत्री सामंत

**मुंबई (वृत्तसंस्था)–डोंबिवली येथे एम आय डी सी मध्ये स्फोट झाला त्यासाठी प्रधान सचिव उद्योग, प्रधान सचिव कामगार आणि प्रधान सचिव पर्यावरण यांची उच्च स्तरीय समिती नेमली आहे. ते तीन आठवड्यात अहवाल सादर करणार आहेत. ते A, B, C categories च्या इंडस्ट्रीचा आढावा घेणार आहेत. ज्या कंपनीने नियमांचे उल्लंघन केले आहे किंवा अनधिकृत बांधकाम केले असेल या सगळ्या बाबींचा सुद्धा आढावा घेतला जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोंबिवलीला भेट दिली त्यावेळी त्यांनी काही निर्देश दिले आहेत त्याचे तंतोतंत पालन या समितीकडून आणि संबंधित अधिकारी यांच्याकडून केले जाणार आहे. अशी माहिती महाराष्ट्राचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. त्यांनी आज मंत्रालयात या संबंधित आढावा बैठक घेतली होती.**

मंत्री उदय सामंत म्हणाले की दोन वर्षापूर्वी एम आय डी सी आणि त्यातील केमिकल कंपन्यांचे स्थलांतरण करण्याचा निर्णय झाला होता. २०२२ मध्ये ठराव देखील झाला होता. मागील एक वर्षापासून पातळ गंगा, जांभवली येथे जमीन अधिग्रहण करण्याची प्रक्रिया देखील सुरू करण्यात आलेली आहे. परंतु आचारसंहितेमुळे ते थांबले होते आता आम्ही निवडणूक आयोगाला पत्र लिहून विनंती करणार आहोत की उद्योजकांना जागा वाटप करण्याची परवानगी द्यावी आणि त्यासाठी प्रक्रिया सुरू करावी, असा निर्णय आज बैठकीत झाला आहे. डोंबिवली स्फोटामध्ये सुमारे १३ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. वाणिज्य नुकसान १२ कोटी आणि रहिवासी नुकसान १ कोटी ६६ लाख आहे. हे सर्व नुकसान भरून काढण्यासाठी महाराष्ट्र सरकार सकारात्मक आहे. मृत व्यक्ती आणि गंभीर दुखापत होऊन डमिट आहेत त्यांचा ही खर्च सरकार करणार आहे. सगळ्यांना मदत करणार आहोत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याबाबत आधीच सूचना दिल्या आहेत. ज्या कंपन्यांचे इन्शुरन्स आहे त्यांना सध्या तरी मदत करण्याची गरज वाटत नाही.भविष्यात महाराष्ट्रातील एम आय डी सी आणि केमिकल झोन मधील कंपनी यांचे स्थलांतरण करण्याचा प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठीचे पावले सरकार उचलत आहेत. ज्या कंपन्यांनी नियमाचे पालन केले नाही. नियमांचे उल्लंघन केले आहे त्यांना त्या संदर्भातील नोटीस दिल्या गेल्या आहेत. या कंपन्या स्थलांतरण करताना त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी राज्य सरकार घेणार आहे.उदय सामंत पुढे म्हणाले की काही दिवसांपूर्वी विरोधी पक्षनेते



यांनी आरोप केला की गेल कंपनी महाराष्ट्रातून निघून गेली त्याला सरकार जबाबदार आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की गेल कंपनी गेली त्याचे खापर आमच्यावर फोडू नये. गेल कंपनीने महाराष्ट्र सरकार कडे परिपूर्ण प्रस्ताव दिलाच नव्हता. त्यांनी रत्नागिरी मध्ये जागा मागितली होती त्यावेळेस एम आय डी सी कडे तिकडे जागा उपलब्ध नव्हती. जेव्हा उपलब्ध झाली तेव्हा त्यांनी आमच्या अधिकाऱ्यांना सरळ सांगितले की रिफायनरी साठी मागे दोन वेळा जे झाले, आंदोलने झाली, राजकीय दबाव टाकला. रिफायनरी पाहिजे की नाही हे नीट सांगितले नाही त्यामुळे त्यांनी पुढे प्रस्ताव दिलाच नाही.राज्य सरकारने स्थानिक पातळीवरील कंपन्या, जिल्हास्तरीय कंपन्या यासाठी शुरिपीळेप आणि गुंतवणुकीसाठी योजना आखली होती. त्यामुळे छत्रपती संभाजी नगर ५६८ कोटी, नाशिक ९७५ कोटी, अमरावती २२९ कोटी, नागपूर १५९ कोटी, पुणे ३०५ कोटी, कोकण ४१६ कोटी म्हणजे एकूण २६५२ कोटींचे चजण झाले आणि गुंतवणूक छत्रपती संभाजी नगर १०३०७ कोटी, नाशिक २१७३३ कोटी, अमरावती ३७४६ कोटी, नागपूर १७८४८ कोटी, पुणे २१८०६ कोटी आणि कोकण २१५४९ कोटी म्हणजेच एकूण गुंतवणूक ९६६८१ कोटी एवढी झाली आणि त्यामुळे २३१३३० रोजगार निर्मिती झालेली आहे. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेमुळे २०१९-२०२० मध्ये १२२० उद्योजक तयार झाले. २०-२१ मध्ये ४८१२ उद्योजक, २१-२२ मध्ये ४०९३ उद्योजक, २२-२३ मध्ये १२३३६ उद्योजक आणि यावर्षी १९८०० उद्योजक म्हणजेच दोन वर्षात ३१००० उद्योजक तयार झाले आहेत. याचाच अर्थ मुखमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून ९०००० रोजगार निर्माण झाले आणि जिल्हास्तरीय २ लाख रोजगार निर्माण झालेले आहेत. त्यामुळे विरोधकांनी आकडेवारी व पेपर्स बघावे उगीच राजकारण करू नये. चरसपर्शीळल चरहरीरिहीर एक मोठा कार्यक्रम आपण ऑगस्ट किंवा सप्टेंबर मध्ये करतोय त्यातूनही मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात गुंतवणूक येईल आणि त्यामुळे मोठी रोजगार निर्मिती होणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली.

## थोडक्यात

### संजय राऊत गांजा पिऊन अग्रलेख लिहितात

**मुंबई**–जे लोक गांजा पिऊन अग्रलेख लिहितात त्यांच्याबद्दल मला विचारू नका असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर हल्ला चढवला आहे. ते सध्या लंडनमध्ये आहेत. त्यांनी तिथे मानसोपचार तज्ज्ञ असतील त्यांच्याकडून उपचार घ्यावेत असेही फडणवीसांनी म्हंटले आहे. ते नागपूरमध्ये पत्रकारांशी संवाद साधत होते.संजय राऊत यांनी रविवारी मुखपत्रातून भाजपवर गंभीर आरोप केले होते. याबाबत फडणवीसांना प्रश्न विचारण्यात आले. यावर उत्तर देतांना त्यांनी राऊतांवर जोरदार पलटवार केला आहे. ''संजय राऊत यांच्याबद्दल मला प्रश्न विचारत जाऊ नका. जे लोक गांजा पिऊन लेख लिहितात, मला वाटत त्यांच्यावर मी बोलू नये. सध्या ते लंडनमध्ये आहेत, तेथे चांगले मानसोपचार तज्ज्ञ आहेत. त्यांनी योग्य ते उपचार घ्यावे'',असे म्हणत फडणवीसांनी हल्लाबोल केला आहे.तसेच विधानसभेच्या जागावाटपावर देखील फडणवीसांनी भाष्य केले आहे. '

### लोकसभेचे मतदान संपताच उपमुख्यमंत्री अजित पवार अडचणीत

**मुंबई**–अजित पवार हे भाजप-शिवसेनेसोबत सत्तेत सहभागी झाल्यानंतर त्यांना अनेक प्रकरणात दिलासा मिळाल्याचे दिसून आले होते. यात ईडीच्या वतीने चौकशी सुरू असलेल्या जरंडेश्वर कारखान्याची चार्जशीट दाखल करताना त्यातून अजित पवार यांचे नाव देखील वगळण्यात आले होते. मात्र, आता लोकसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया संपल्यानंतर पुन्हा एकदा एसीबीने या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. त्यामुळे अजित पवार यांच्या अडचणी पुन्हा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार त्यांच्याशी संबधित असलेल्या जरंडेश्वर साखर कारखान्याची पुन्हा एकदा चौकशी सुरू करण्यात आली आहे. राज्याच्या लाचलुचपत विभागाच्या वतीने अर्थात एसीबीकडून ही चौकशी सुरू करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे. जरंडेश्वर कारखान्याची चौकशी म्हणजे अजित पवारांसाठी हा मोठा धक्का असल्याचे मानले जाते आहे.

### डोके ठिकाणावर ठेऊन आरोप करावे–शिरसाट

**भद्रावती**–छत्रपती संभाजीनगर-पुणे हिट अँड रनप्रकरणी विरोधकांकडून सातत्याने होत असलेल्या टीकेला शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी प्रत्युत्तर दिले आहे. पुणे अपघाताबाबत गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न सुरू आहे. विरोधकांना नवीन दुकान सुरू करायचंय. आरोप करणे हाच त्यांचा धंदा आहे अशी टीका संजय शिरसाट यांनी केली आहे.

पुणे अपघाताबाबत संजय शिरसाट म्हणाले, ''सध्या अजित पवार का नाही बोलले, आयुक्त काय करत आहेत? फडणवीस काहीच का बोलत नाहीत? असे म्हणत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. असे प्रश्न उपस्थित करून प्रकरणाला वेगळे वळण दिले जात आहे. अपघातात दोघांचा बळी गेला. त्यामुळे आरोपीवर कठोर झाली पाहिजे हीच राज्य सरकारची भूमिका आहे. पोलिस देखील त्यासाठी कसून चौकशी करत आहेत'', असे संजय शिरसाट यांनी स्पष्ट केले. विरोधकांकडून समितीमध्ये यापूर्वी आरोप असलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश केल्याचा आरोप केला जात आहे. या आरोपांवर शिरसाट म्हणाले, ''सध्या हे प्रकरण हाताळणे महत्वाचे आहे. भ्रष्टाचाराचे आरोप ज्यांच्यावर आहेत त्यांची चौकशी सुरू आहे हा भाग वेगळा आहे. मात्र या प्रकरणात प्रत्येकाचे बारीक लक्ष आहे. त्यामुळे एखादा अधिकारी चांगले काम करत असेल तर त्याला पुन्हा संधी दिली तर काय हरकत आहे.

## सुरजागड धावणाऱ्या 'नो पार्किंग' मधील ४० वाहनांवर एकाच दिवशी गोंडपिपरी पोलीसांची धडक कारवाई

**गोंडपिपरी | सूरज माडूरवार**

सुरजागड येथे लोहखनिज आणन्याकरीता हायवा मोठ्या प्रमाणात जात असते दिवस रात्र वाहनांची वर्दळ असते.कंपनीची स्वतंत्र पार्किंग व्यवस्था असताना सुधा अनेक वाहने गोंडपिपरी शहरात राष्ट्रीय महामार्गावर अनाधिकृत पार्किंग केली असते.अपघाताचे वाढते प्रमाण लक्षात घेता या वाहणांविरोधात गोंडपिपरी पोलिसांनी कारवाईची मोहीम सुरू केली आहे.

सुरजागड जाण्याकरिता शहरातून हायवा जात असतात.यांना कुठलीही शिस्त राहिली नाही.अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे अनेकांना जीव गमवावा लागला अनेकांना अपंगत्व आले.वाढत्या अपघाताची गंभीर दखल घेत ठाणेदार रमेश हत्तीगोटे,पिएसआय मरापे,कराडे यांच्या मार्गदर्शनात मनोहर मत्ते,गणेश पोदाळी क्शन मोड मधे येत दि.२९ मंगळवारी एका



दिवसात नो पार्किंग मधे असणाऱ्या ४० हायवांवर कलम १२२ मोटार वाहन कायद्याअंतर्गत एकून वीस हजार रुपये दंड आकारण्यात आला.सदर कारवाई रोज सुरू राहणार असल्याचे ठाणेदार हत्तीगोटे यांनी सांगितले.

## उष्मालाटेच्या अनुषंगाने २९ व ३० मे रोजी जिल्ह्याकरीता यलो अलर्ट जारी

### उष्माघाताबाबत खबरदारी घेण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात उष्णतेचा तडाखा वाढत असून उष्मालाटेच्या अनुषंगाने २९ आणि ३० मे रोजी जिल्ह्याकरीता येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताची शक्यता असल्याने नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.जे नागरीक घराबाहेर बराच वेळ घालवतात त्यांना उष्माघाताचा धोका होण्याची शक्यता असते. त्यामुळे शरीरातून घामाच्या धारा निघत असतील तर जास्तीत जास्त पाणी पिण्याचा सल्ला देण्यात आला आहे. कारण शरीराला पुरेसे पाणी न मिळाल्यास उष्णता जीवघेणी ठरु शकते. जेव्हा शरीराचे तापमान धोकादायक पातळीपर्यंत वाढते आणि शरीराची शीतकरण यंत्रणा योग्यरित्या कार्य करण्यास अपयशी ठरते तेव्हा ही स्थिती उद्भवू शकते.

उष्माघाताची लक्षणे : शरीराचे उच्च तापमान, अनेकदा १०४ओफ़(४०ओउ) पेक्षा जास्त असते. यामुळे गोंधळ, चक्कर येणे आणि मळमळ होऊ शकते. नाडीचे ठोके वाढणे आणि डोकेदुखी ही देखील सामान्य लक्षणे आहेत. त्वचा उष्ण आणि कोरडी किंवा ओलसर आणि घाम वाटू शकते. गंभीर प्रकरणांमध्ये बेशुद्ध पडणे किंवा झटके येऊ शकतात. स्वतःला किंवा इतर कोणाला ही लक्षणे दिसल्यास तत्काळ वैद्यकीय मदत घेणे आवश्यक आहे.उष्माघात टाळण्यासाठी काय करावे : उष्माघातापासून बचाव करण्यासाठी सर्वोत्तम मार्ग म्हणजे सूर्यप्रकाशात दीर्घकाळ राहणे टाळावे. घराबाहेर पडतांना डोके झाकण्यासाठी टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करावा. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. थेट येणाऱ्या सुर्यप्रकाशाला/उन्हाला अडविण्याकरिता घरातील पडदे आणि झडपांचा वापर करावा. भरपूर पाणी प्यावे, सोबतच ओआरएसचा वापर करावा. पाणीयुक्त फळे खावीत. नागरीकांनी सुरक्षित राहण्यासाठी खबरदारी घेणे अत्यंत महत्त्वाचे असून वृद्ध, लहान मुले तसेच पूर्व- अस्तित्वात असलेली वैद्यकीय परिस्थिती ज्यांची चांगली नाही त्यांनी अतिरिक्त काळजी घेणे गरजेचे आहे.काय करु नये : उन्हात अतिकष्टाची कामे करु नये. दारु, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड थंड पेये घेऊ नये. दुपारी १२ ते ४ च्या दरम्यान घराबाहेर जाणे टाळावे. उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नये. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान जास्त असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावी. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे. तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्या. चप्पल न घालता अनवाणी उन्हात चालू नये.

## सीईओ साहेब हे चाललय तरी काय.....?

# समकक्ष अधिकारी असताना मुलचा अधिकारी चालवतो गोंडपिपरी पंचायत समितीचा कारभार

**गोंडपिंपरी | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या गोंडपिपरी तालुक्याचे सद्या तीन तेरा वाजले आहे. गोंडपिपरी पंचायत समितीच्या उदासीन धोरणामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहे. गोंडपिपरी पंचायत समितीमध्ये संवर्ग विकास अधिकारी म्हणून शालिक माऊलीकर हे मागील दहा महिन्या आधी निवृत्त झाले ते निवृत्त झाल्याने नियमित अधिकारी गेल्याने गोंडपिपरी पंचायत समितीचा कार्यभार हा प्रभाऱ्यांच्या भरोशावर सुरू होता त्यामुळे तालुक्यातील जनतेला अनेक त्रासाला पुढे जावे लागत होते तसेच विकास कामाचाही खोळंबा झालेला निदर्शनास येत होता.अखेर महाराष्ट्र शासनाने अनेक संवर्ग विकास अधिकाऱ्यांच्या पदावर अनेक अधिकाऱ्यांना बढत्या दिल्या

शासन परीपत्रकानुसर. महाराष्ट्र विकास सेवा गट -अ मध्ये अतिरिक्त गटविकास अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्याचा समावेश होतो तसेच महाराष्ट्र विकास सेवा गट- ब मध्ये सहाय्यक गटविकास अधिकारी या संवर्गाच्या अधिकाऱ्याचा समावेश होतो त्यामुळे गोंडपिपरी पंचायत समितीमध्ये दुसऱ्या दर्जाचा अधिकारी नसल्यामुळे येथील प्रभार हा नेहमीच बाहेरील सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यांकडे राहिला होता.महाराष्ट्रात अनेक अधिकाऱ्यांना बढती दिली त्यात चंद्रपूर जिल्ह्याला सात सहाय्यक गटविकास अधिकारी नव्याने रुजू झाले आणि त्यातील एक गोंडपिपरी येथे स्थायी गटविकास अधिकारी मिळाला. माऊलीकर यांच्या नंतर




**गोंडपिपरीत समकक्ष अधिकारी असताना मुलच्या अधिकाऱ्याकडे बीडिओचा प्रभार देण्यात आला हे अत्यंत चुकीचे आहे, सर्वसामान्य नागरिकांचे अनेक कामे खोळबत आहेत.पुप्पलवार यांच्याकडे कायमस्वरूपी प्रभार देण्यात यावा.मुलचे अधिकारी चनफने यांचा गोंडपिपरीचा प्रभार तात्काळ काढण्यात यावा.अन्यथा सात दिवसानंतर तीव्र आंदोलन पंचायत समिती समोर करण्यात येईल.**

**सुरज माडूरवार,शिवसेना तालुकाप्रमुख गोंडपिपरी**

प्रभाऱ्यांच्या भरोशावर चाललेल्या पंचायत समितीचा डोलारा सुरळीत चालेल अशी आशा गोंडपिपरी वासियांची पल्लवीत झाली होती. संवर्ग विकास अधिकाऱ्याचे सूत्र पुप्पलवार यांच्या कडे देण्यात आले.परंतु काही दिवसातच समकक्ष अधिकारी असताना सुधा गोंडपिंपरीच्या पंचायत समितीचा कार्यभार हा मूल येथील अरुण चनफने सहाय्यक गटविकास अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे गोंडपिपरी पंचायत समिती मधील विकास कामाचा खोळंबा होत आहे तर अनेक नागरिकांची पायपीट होत आहे.स्थाई अधिकारी असताना त्यांना डावळून बाहेरील मर्जीतील अधिकाऱ्याला प्रभार दिल्याने आर्थिक देवाणघेवाण झाली का असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहे.

सध्या निवडणुकीचा काळ असल्याने जिल्ह्यातील स्थानिक नेते हे निवडणुकीत व्यस्त असल्याने चाललेल्या अजब कारभाराकडे दुर्लक्ष झालेले होते. परंतु निवडणुका आता संपले असल्याने जिल्हा परिषदेच्या अजब कारभाराकडे लक्ष देऊन लोकहित जपले पाहिजे अशी मागणी सुज्ञ नागरिकाकडून केली जात आहे.

# ...अन् त्या प्रेमीयुगुलांचे मृतदेह आढळले

### चिंतलधाबा येथील घटना ; मृत्यूचे कारण अस्पष्ट आत्महत्या की हत्या लोकांमध्ये संभ्रम कायम

**पोंभूर्णा | प्रतिनिधी**

दिड वर्षांपासून प्रेमाच्या आणाभाका घेतलेले दोन्ही विवाहीत प्रेमीयुगुलांचे अखेर शेतशिवारात संशयितरित्या मृतदेह सापडले.सदर घटना दि.२७ मे सोमवारला सात वाजताच्या सुमारास निदर्शनास आली.रुपेश मधुकर मिलमिले वय (३२), रा.चिंतलधाबा, व शशिकला खुशाब कुसराम वय (२७) रा.भटारी असे आत्महत्या केलेल्या प्रेमी युगलाचे नाव आहे.

भटारी येथील शशिकला कुसराम हि आपल्या नवऱ्यापासून विभक्त राहत होती.तर रुपेश ने दिड वर्षांपुर्वी आपल्या पत्नीला घटस्फोट दिला होता.रुपेश भाजीपाला विक्रीसाठी भटारी येथे जात होता.यादरम्यान त्यांचे सुत जुळले.दोघांचेही एकमेकावर प्रेम होते.घटनेच्या दिवशी दुपारी शशिकला व रुपेश हे दोघेही गणेश मिलमिले यांच्या शेतशिवाराकडे गेले.व दोघांनी आपली जीवनयात्रा संपवली.रुपेशचा शव हा विहिरीत तर शशीकला हि विहीरीच्या बाजूला मृतावस्थेत आढळले.सदर घटनेची माहिती पोंभूर्णा पोलिसांना मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले व पंचनामा केला.दोघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी पोंभूर्णा ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले मात्र दि.२८ मे च्या सकाळच्या चार वाजेपर्यंत शवविच्छेदन करण्यात आले नव्हते.अचानक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मृतक दोघांचेही मृतदेह फॉरेन्सीक मेडीसिन टेक्नॉलॉजी शवविच्छेदनसाठी चंद्रपूरला पाठविण्यात आले.शेवटी दि.२८ मे ला दुपारी ३ वाजताच्या दरम्यान दोघांचेही शवविच्छेदन करण्यात आले.मात्र पोंभूर्ण्यात शवविच्छेदन न झाल्याने घटनेला एक वेगळे वळण मिळाले आहे.सदर घटना हि आत्महत्या आहे की हत्या याचा तपास करणे पोलिसांसाठी आवाहन राहणार आहे.घटनेचे पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक धनराज सेलोकर, अंमलदार नैताम,हवालदार राजकुमार चौधरी करीत आहेत.

**शशिकला ही मागील दोन वर्षांपासून आपल्या नवऱ्यापासून विभक्त राहत होती.तर रुपेश हा दिड वर्षांपूर्वी आपल्या पत्नीपासून घटस्फोट घेतलेला होता असे म्हटले जात आहे.**


**दोघांचे शव हे संशयास्पद आढळून आले असल्याने. सदरची घटना आत्महत्या आहे की हत्या यांची चौकशी पोलिसांसाठी आवाहन आहे.पोलिसांच्या चौकशीतून पुढे काय समोर येणार याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.**

**वरिष्ठ पोलिसांनी दिलेल्या आदेशानुसार पोंभूर्णा येथे शवविच्छेदन न करता चंद्रपूरला दोन्ही मृतदेह हलविण्यात आले.फॉरेन्सीक मेडीसिन टॉक्सीकोलॉजी एक्सपर्ट च्या उपस्थितीत दि.२८ मे ला दुपारी तीन वाजताच्या दरम्यान शवविच्छेदन करण्यात आले.**

# पचनक्रिया सक्षम: शरीरावयव भक्कम!

**पचन ही एक रासायनिक प्रक्रिया आहे, ज्यात आपण खाल्लेले अन्न पचनग्रंथींच्या स्त्रावांच्या संमिश्रणाने सरल रेणूंमध्ये रुपांतरित होते. ही संस्था अन्ननलिका तोंडापासून सुरू होऊन पुढे घसा, जठर, लहान आतडे, मोठे आतडे आणि गुदद्वार अशी बनलेली असते. त्यांत लाळ उत्पादक ग्रंथी, जठर, यकृत, स्वादुपिंड, आणि लहान आतडे यांचा समावेश असतो. स्वतः डॉक्टर नसूनही माझे आरोग्य, माझ्याच हाती या उक्तीप्रमाणे श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी खास वाचकांच्या सेवेत सदर संकलित लेख प्रस्तुत करताहेत... संपादक.**

डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आरोग्याची काळजी घेण्याच्या काही महत्त्वाच्या टिप्स- ॐ निरोगी आहार व विहार जीवनशैली योग्य असणे आवश्यक. ॐ फळे, पालेभाज्या, फायबरयुक्त आहार घेणे गरजेचे. ॐ शरीरासाठी पाणी हे अमृतासारखे आहे. दिवसभरात कमीतकमी पाच लिटर पाणी प्यावे. ॐ योग्य प्रमाणात पाणी पिल्याने पचनक्रिया सुधारते. ॐ रोजच्या जेवणात स्निग्ध पदार्थ, सकस, संतुलित, नियमित, पुरेसा आणि ताजा आहार व्यक्तीला मिळाल्यास आरोग्य सुधारते. ॐ आहारावर आरोग्य विषयक स्थिती अवलंबून असते. ॐ आहारातील स्वच्छतेमुळे आरोग्याला पोषक स्थिती निर्माण होते. ॐ अस्वच्छतेमधून मलेरिया, गॅस्ट्रो आदीसारखे रोग उद्भवतात. ॐ वैयक्तिक व सार्वजनिक पातळीवर व्यक्तीने स्वच्छतेसंबंधी काळजी घेतली पाहिजे. ज्यामुळे आरोग्य चांगले राहते. ॐ सुयोग्य मनोरंजनामुळे व्यक्तीला शारीरिक, मानसिक स्वास्थ्य लाभते. ॐ नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. ॐ व्यायामामुळे आरोग्य व्यवस्थित- सुदृढ राहते. ॐ व्यायामासोबतच विश्रांतीही तेवढीच महत्त्वाची आहे. ॐ आरोग्य आणि विश्रांती या दोन्ही प्रक्रियांचा आंतरिक सहसंबंध आहे.



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

आरोग्य किंवा तब्बेत हा शब्द असा आहे की, त्याचा अर्थ काय? हे आपणा सगळ्यांना माहित आहे. पण ते नेमक्या शब्दांत सांगता ये नाही. आरोग्य किंवा स्वास्थ्य म्हणजे जेव्हा शरीर आणि मन व्यवस्थित असते म्हणजेच कोणताही रोग, आजार वा वेदना नसतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या दृष्टीने आरोग्य म्हणजे नुसता रोगांचा अभाव नसून ती एक शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक समतोलाची अवस्था आहे. खाल्लेल्या अन्नाचे पचन व्यवस्थित झाले तरच स्वास्थ्य व्यवस्थित राहते. २९ मे रोजी जागतिक पचन स्वास्थ्य दिवस आहे. आपली पचनक्रिया स्वस्थ असेल तर आपले आरोग्य देखील चांगले- स्वस्थ राहते. कारण ९० टक्के आजाराचे मूळ पचनक्रियांशी संलग्न असते. मनुष्याचे शरीर स्वस्थ तेव्हाच असते जेव्हा पचनक्रिया व्यवस्थित असेल. जेव्हा शरीर आणि मन हे दोन्ही व्यवस्थित असतात तरच आपण आपली नेहमीची कामे नीट, व्यवस्थित करू शकतो.

आरोग्य चांगले राहण्यासाठी आपले शरीरही निरोगी हवे. मनाची उभारीही असावी आणि सामाजिक आरोग्याची स्थिती देखील चांगली असावी. चांगली तब्बेत किंवा आरोग्य म्हणजे नुसता औषधोपचार नाही तर आनंदी व सुखी जीवनही व्यवस्थित असणे महत्त्वाचे आहे. अशी शरीराची आणि मनाची अवस्था असते. भक्कम शरीर म्हणजे ज्यावेळी शरीर संपूर्णपणे काम करण्यास सक्षम असते. आपल्या शरीराचा एखादा अवयव नीट काम करत नसेल तर म्हणजेच डोळ्यांना जर नीट दिसत नसेल, कमी ऐकू येत असेल, खांदे दुखत असतील तरी आपण कामे करतच राहतो. पण ज्याला हा कोणताच त्रास नसतो, तो जास्त आणि चांगले काम करू शकणार नाही का? आरोग्य ही संकल्पना अत्यंत व्यापक अर्थाने उपयोगात आणली जाते. आरोग्य म्हणजे स्थुल मानाने शारीरिक, मानसिक, सामाजिक संतुलनाची स्थिती होय. आरोग्यास असंतुलन निर्माण झाल्यास रोग- व्याधी जडतात. जी व्यक्ती आपली सामाजिक भूमिका सुव्यवस्थित पार पाडण्यास शारीरिक, मानसिक दृष्ट्या सक्षम असते. ती आरोग्यसंपन्न मानली जाते. म्हणून आरोग्य ही संकल्पना अत्यंत महत्वपूर्ण आहे. याविषयावर डॉक्टर म्हणतात की, आपली पचनक्रिया स्वस्थ असेल तर आपले आरोग्य देखील स्वस्थ राहते. कारण बहुसंख्य व्याधींना कारणीभूत पचनक्रियाच असते. पचनक्रिया चांगली राहण्यासाठी निरोगी आहार व विहार जीवनशैली योग्य असणे अत्यावश्यक आहे. व्यक्तीची पचनक्रियाच काम सुरळीतपणे पार पाडत नसेल तर त्यास अपचनाचा आजार जडतात. जसे की, आम्लपित्त, उलटी, जुलाब, जाडेपणा, मधुमेह. त्यासाठी आहार हा पौष्टिक असावा लागतो. निरोगी राहणे हे व्यक्तीच्या सात्विक जीवनशैली आणि पौष्टिक आहार यांवर अवलंबून असते. पचनशक्ती सशक्त राहण्यासाठी फळ, पालेभाज्या आणि फायबरयुक्त आहार घेणे गरजेचे असते. रोजच्या जेवणात जास्त मेदयुक्त पदार्थ खाऊ नयेत. त्यामुळे पचनक्रिया मंदावते. शरीरासाठी पाणी हे अमृतासमान आहे. योग्य प्रमाणात पाणी पिल्याने पचनक्रिया सुधारते आणि पोट साफ होण्यास मदत होते. जर शरीरामध्ये पाण्याचे प्रमाण कमी असेल, तर पचन संस्था व्यवस्थित कार्य करत नाही. त्यामुळे पित्ताचा त्रास उद्भवतो. खाण्यापिण्यासोबतच धूम्रपान आणि मद्यपान सेवन करू नये. कामातील ताणतणाव टाळावे. रोज तीन वेळा व्यवस्थित आणि वेळेवर जेवण करावे. प्रत्येकांनी व्यायाम नियमित करणे गरजेचे आहे.

!! आंतरराष्ट्रीय पचन स्वास्थ्य दिनाच्या सर्व भावाबहिणींना निरामय जीवनाकरीता हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

## बुद्ध-बाबासाहेबांच्या समताधिष्ठित प्रबोधनासाठी

# वामनदादा सारख्या कलावंताची गरज-अहेतेशाम अली

**वरोरा । प्रतिनिधी**

महाकवी, लोकशाहीर वामनदादा कर्डक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्या ओजस्वी वाणीतून आणि समर्थ लिखाणातून महाराष्ट्राच्या घराघरात, खेड्यापाड्यात, वाड्या तांड्यात पोहोचवण्याचे काम केले. बुद्ध -फुले -आंबेडकर यांचा विचार हा वामनदादाचा श्वास होता ,ऊर्जा केंद्र होते हे विचार प्रभावीपणे प्रसारित करत वामनदादा जीवनाच्या शेवटपर्यंत फिरत राहिले त्यामुळे समाज जागृती होत राहिली.मात्र वामनदादा नंतर समतावादी विचार तेवढ्याच ताकदीने,निस्वार्थपणे पोहचविण्यास कलावंतांचे प्रयत्न कमी पडले. म्हणूनच आजच्या काळात बुद्ध -फुले -आंबेडकर विचाराच्या प्रसाराकरिता महाकवी वामनदादा सारख्या कलावंताची गरज असल्याचे प्रतिपादन अहेतेशाम अली माजी नगराध्यक्ष वरोरा यांनी दि.२५मे रोजी वामनदादा कर्डक विचार मंचच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी केले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुशिला भगत ,सामाजिक कार्यकर्त्या आलापल्ली ह्या होत्या तर उद्घाटक म्हणुन अहेतेशाम अली, माजी नगराध्यक्ष वरोरा प्रमुख अतिथी विनोद खोब्रागडे, कायदे विषयी अभ्यासकवरोरा शोभा वेले, ज्येष्ठ कवीयत्री नागपूर,राजेश सोलपण, जिल्हाध्यक्ष ग्रामीण पत्रकार संघ चंद्रपूर,मुकेश जीवतोडे चंद्रपूर शिवसेना जिल्हाध्यक्ष इत्यादी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. प्रथम सत्रात कुमारी स्नेहल शिरसाट हिने आपल्या सुमधुर आवाजात स्वागत गीत सादर केले .त्यानंतर विनोद खोब्रागडे कायदे अभ्यासक वरोरा यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले. दुसऱ्या सत्रामध्ये बुद्ध-भीम गीत गायन स्पर्धा घेण्यात आली यामध्ये ३६ स्पर्धकांनी भाग घेतला होता सदर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक सोहम कुमरे दुतीय क्रमांक देविका भोयर तृतीय क्रमांक अश्विनी पाटील यांनी पटकावला गीत गायन स्पर्धेचे सूत्रसंचालन हेमंत शेंडे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक यांनी केले.

तर तिसऱ्या सत्रामध्ये निमंत्रितांचे कवी संमेलन घेण्यात आले या कवी संमेलनाचे अध्यक्ष प्रा. ईसादास भडके महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक व ज्येष्ठ कवी चंद्रपूर हे होते तर विशेष अतिथी शोभा वेले कवयित्री नागपूर ड. योगिता रायपूरे चंद्रपूर ह्या उपस्थित होत्या या कार्यक्रमाचे धारदार सूत्रसंचालन नरेंद्र सोनारकर, विद्रोही कवी बल्लारपूर यांनी केले आणि शेवटच्या पर्वामध्ये सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा सत्कार करण्यात आला यामध्ये दशरथ शेंडे, चेतन शर्मा, किरण साळवी ,वंदना मून अशोक गुरुवाले यांचा सत्कार करण्यात आला सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सुनील शिरसाट, अमर गोंडाणे ,हितेश राजनहिरे ,सागर ढोके , पुष्पा साठे ,उषा मुन ,मेघा भालेराव योगेश खोब्रागडे, माया सखदेवे यांनी अथक परिश्रम घेतले

उद्घाटकीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमर गोंडाने , यांनी केले तर सूत्रसंचालन विजय भसारकर व आभार रंगशाम मोडक यांनी व्यक्त केले

# मुंबईत पुढील ४ दिवस कोसळणार पाऊस मराठवाडा, विदर्भातही पावसाची शक्यता

**पुणे**-मुंबईसह उपनगरात पुढील ४ दिवस पावसाची शक्यता आहे. याशिवाय येत्या २४ तासांत मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्यातील काही ठिकाणी तापमानाचा पारा चाळीशीच्या पुढे गेला आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागतोय. मात्र आता पुन्हा एकदा राज्यात पावसाची शक्यता असल्याने मिळण्याची शक्यता आहे.पहाटेपासून उकाड्याची जाणीव होत असल्याने मुंबईकर हैराण झाले आहेत. दरम्यान, पुढील तीन-चार मुंबईसह उपनगरात ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे. त्याचबरोबर आजपासून ४ दिवस हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांना देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे.भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार, येत्या २४ तासांत मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुणे, रत्नागिरी,



रायगड, कोकण, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांत पावसाचा अंदाज आहे. अहमदनगर, नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धुळे, नंदुरबार, पालघर, ठाणे जिल्ह्यातही पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.दरम्यान, मान्सूनबाबत देखील एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. पुढील तीन ते चार दिवसांत केरळमध्ये मान्सून दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. केरळमध्ये मान्सूनसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत असल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे. तर महाराष्ट्रात जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मान्सूनचे आगमन होण्याचा अंदाज आहे.याशिवाय जून महिन्यात विदर्भ आणि मराठवाड्याच्या तुलनेत कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात पावसाचा जोर जास्त राहण्याचा अंदाज आहे. जूनमध्ये एल-निनो निष्क्रिय अवस्थेत जाईल. जुलै ते सप्टेंबर या काळात ला-निना स्थिती सक्रिय होईल. याचा परिणाम म्हणून जून ते जुलै या पहिल्या टप्प्यापेक्षा ऑगस्ट ते सप्टेंबर या मोसमी पावसाच्या दुसऱ्या टप्प्यात अधिक पाऊस पडण्याचा अंदाज आहे. १० ते १२ जूनला मुंबईत पावसाचे आगमन होणार, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# संजय राऊत गांजा पिऊन अग्रलेख लिहितात:लंडनमध्ये मानसोपचार तज्ज्ञांकडून उपचार घ्यावेत-फडणवीस

**मुंबई**-जे लोक गांजा पिऊन अग्रलेख लिहितात त्यांच्याबद्दल मला विचारू नका असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर हल्ला चढवला आहे. ते सध्या लंडनमध्ये आहेत. त्यांनी तिथे मानसोपचार तज्ज्ञ असतील त्यांच्याकडून उपचार घ्यावेत असेही फडणवीसांनी म्हटले आहे. ते नागपूरमध्ये पत्रकारांशी संवाद साधत होते.संजय राऊत यांनी रविवारी मुखपत्रातून भाजपवर गंभीर आरोप केले होते. याबाबत फडणवीसांना प्रश्न विचारण्यात आले. यावर उत्तर देतांना त्यांनी राऊतांवर जोरदार पलटवार केला आहे. ''संजय राऊत यांच्याबद्दल मला प्रश्न विचारत जाऊ नका. जे लोक गांजा पिऊन लेख लिहितात, मला वाटत त्यांच्यावर मी बोलू नये. सध्या ते लंडनमध्ये आहेत, तेथे चांगले मानसोपचार तज्ज्ञ आहेत. त्यांनी योग्य ते उपचार घ्यावे'',असे म्हणत फडणवीसांनी हल्लाबोल केला आहे.तसेच विधानसभेच्या जागावाटपावर देखील फडणवीसांनी भाष्य केले आहे. ''जागा वाटपाबाबत आमची चर्चा होणार आहे. त्यानंतर निर्णय होईल. महायुती योग्य प्रकारे निवडणूक लढवेल.

# इतिहासाच्या कुशीत

उज्बेकिस्तान प्रवासाच्या चौथ्या दिवशी मोहीम होती समरकंद या शहराची. उज्बेकचे हे दुसर्या क्रमांकाचे शहर. या शहराची स्थापना, निर्मिती बाबत इ.स. पूर्व सातव्या शतकापासून पुरावे, माहिती मिळते. मात्र या शहराची खरी ओळख सांगायचे झाले तर चीन, मध्य आशिया आणि युरोपला जोडणार्या रेशिम मार्ग(सिल्क रुट) चे सर्वात महत्वाचे स्थान. रेशिम मार्गाची कहानी इ.स. पूर्व दुसर्या शतकापासून ते पंधराव्या शतकापर्यंत आहे. जवळपास ६४०० किमी लांबीच्या या मार्गाने पूर्व आणि पश्चिम भुभाग जोडले गेले, त्यांच्यात व्यापार, आर्थिक, संस्क्रुती, राजकीय आणि धार्मिक बाबींत देवाणघेवाण झाली. मध्य आशियातील हे शहर वारंवार आणि निरनिराळ्या आक्रमणांचे मुक साक्षिदार आहे. अगदी अलेक्झांडर पासून अरब, मंगोल, तुर्क आणि रशियन आक्रमणाने इथे धुमाकूळ घातला होता. ताश्कंद पासून ३०० किमी अंतरावर असलेल्या समरकंद साठी आम्ही हाय स्पिड ट्रेनचा पर्याय निवडला होता. जी ट्रेन जुन्या ट्रॅकवर २०० पर्यंत आणि नवीन ट्रॅकवर २५० किमी प्रती तास धावू शकते तिला हाय स्पिड ट्रेन म्हणतात. इथले रेल्वे स्थानक असो अथवा कोणतीही वास्तू, प्रत्येक जागा भव्य आणि प्रशस्त! अर्थातच कुठलीही गर्दी, धक्काबुक्की नाही की सतत कानावर आदळणार्या कर्कश सूचना. सर्वकाही शांततेत, सुव्यवस्थेत आणि वेळेवर. प्रत्येक कोच च्या दाराजवळ कोच ऑफिसर प्रत्येकाला सिट समजवून सांगणे, वयस्करांना चढ उतरण्यास मदतीचे काम करत होते. इथेही विमानतळासारखी सुरक्षा व्यवस्था, तपासणी होती. तर आंत इकॉनॉमी आणि बिझनेस क्लास होते. सकाळी नऊ ला निघालेल्या हाय स्पिड ट्रेनने सर्वाधिक २३६ किमी ची गती गाठत बरोबर अकरा वाजता, तिच्या नियोजीत वेळी समरकंदला पोहोचवले. समरकंदचे प्रमुख आकर्षण होते, गुर ए अमीर स्मारक, ज्याचा अर्थ होतो राजाचा, सेनापतीचा मकबरा. उज्बेकिस्तामध्ये तैमूरला राष्ट्रनायक म्हणतात. या स्मारकात तैमूर, त्याची दोन मुले शाहरूख, मिरन





शहा, नातू ऊलूघ बेग, मुहम्मद सुलतान आणि तैमूरचा धर्मगुरू सय्यीद बरका यांच्या सहीत एकूण नऊ थडगी आहेत. या स्मारकाच्या बांधकामावर मध्य आशियन स्थापत्य कलेचा प्रभाव आहे. यावरूनच पुढे मुगल वास्तू रचना, काबूलचे गार्डन ऑफ बाबर, दिल्लीतील हुमायूंचा मकबरा आणि आग्र्याचा ताजमहल बांधल्याचे सांगितल्या जाते. या स्मारकाची आणि संलग्न दोन मिनारची ऊंची प्रत्येकी ३० मिटर आहे. आवारात दहा फूट लांबीचे, सहा फूट रूंदीचे आणि तीन फूट उंचीचे दगडी आसन आहे, त्यालाच तैमूरचे आसन म्हणतात. जवळच चार टन वजनी दगडी पात्र आहे, ज्यातील पाणी पवित्र मानतात. तैमूर चीनच्या कामगिरीवर असताना वयाच्या ६९ व्या वर्षी न्युमोनियाने म्रुत्युमुखी पडला. त्याचा नातू मुहम्मद सुलतानने हा मकबरा बांधणे सुरू केले तर दुसरा नातू उलूघ बेगने हे बांधकाम पूर्ण केले. विटांच्या भिंती आणि पांढर्या निळ्या रंगाच्या टाईल्सने संपूर्ण मकबरा व त्याचा घुमट बांधला गेला आहे. १७ व्या शतकात बुखारा ही नवीन राजधानी झाल्याने व रेशमी मार्ग बदलल्याने समरकंदचे महत्व घटले. रशियन आक्रमणात, सोवीयत शास्त्रज्ञांनी तैमूरची कबर खोदून संशोधन केले. पण असे म्हणतात की तैमूरची कबर खोदाल तर जगाचा

**भाग ०८**


विनाश घडेल आणि योगायोग म्हणजे झालेही तसेच. नाझींनी सोवीयतवर आक्रमण करत हा समज पक्का केला. अखेर स्टॅलीनने तैमूरला परत थडग्यात पुरून वाद मिटवला. याच्या एक महिन्यानंतर स्टॅलीनग्रॅडला सोवीयत फौजांनी नाझींना घेरून बाजी पलटवली होती. यानंतर रेगिस्तान चौक या स्थळाला भेट दिली, जे पर्यटकांनी गजबजून गेले होते. १४ व्या शतकापर्यंत इथे नदी असल्याचे मानले गेले होते. तीन मोठ्या मॉस्कची रचना असलेले हे स्थळ तीन वेगवेगळ्या काळात बांधले गेले आहे. पर्शियन वास्तुकलेचा नमुना असलेली ही वास्तू एकमेकांसमोरील तीन इमारतींची आहे. सर्वात डावीकडे उलूघ बेग मदरसा (१४१७ते १४२०) आहे, ज्याची निर्मिती स्वतः उलूघ बेग याने केली. यात दोन मजली मदरश्याला उंच मिनार, चार घुमट आणि धार्मिक शिक्षणासाठी काही खोल्या आहेत. मधली इमारत शेर दोर मदरसा (१६१९ ते १६४०) म्हणून ओळखली जाते. याचे आणि तिसर्या क्रमांकाच्या वास्तूचे बांधकाम (टिल्या कोरी मदरसा १६४६ ते १६६०) तत्कालीन राजा यालंग्तुश बाखोडर ने केल्याचे सांगितले जाते. खरेतर या तिन्ही मदरशांचा उद्देश विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षण, प्रचार, प्रसार करण्यासाठी होत होता. इथेच सरकारी आदेश, फर्मान सोडले जायचे. तैमूर साम्राज्याचे हे महत्वपूर्ण स्थळ होते. समरकंदची ओळख असलेले आणि मास्टरपीस ऑफ तैमूर एम्पायर असलेले स्मारक म्हणजे बिबी खानम मकबरा. १५ व्या शतकातील सर्वोत्तम, सर्वात मोठी वास्तू मानली गेलेल्या या इमारतीचे बांधकाम १३९९ ते १४०५ पर्यंत खुद्द तैमूरच्या देखरेखेखाली केले गेल्याचे मानले जाते. प्रवेशद्वार ३० मिटर तर मुख्य उमारत ४० मिटर उंचीची आहे. ही वास्तू लांबी १६७ मिटर तर रुंदी १०९ मिटर आहे. यांत चार मिनार आणि चार गोल घुमट आहेत. दिल्ली स्वारी यशस्वी झाल्यावर तैमूरने आपल्या पत्नीसाठी बिबी खानम मकबरा बांधल्याचे कळते. यालाच फ्रायडे मॉस्क, मॉस्क ऑफ फिअर पण म्हणतात. कारण ही वास्तू बांधतांना प्रचंड पडझड झाली आणि बांधून पूर्ण होताच एक वर्षाच्या आत तैमूरचा म्रुत्यू झाला. वारा, हवामान आणि भुकंपाच्या झटक्याने ही इमारत खचत होती. १८९७ च्या भुकंपात आतली कमान गळून पडली. अखेर २० व्या शतकात सोवीयतने नंतर उज्बेकांनी याची पुनर्निर्मिती केली.

**डॉ.अनिल पावशेकर**
**मो. ९८२२९३९२८७**

# ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केली टाटा कॅन्सर हॉस्पीटलच्या बांधकामाची पाहणी

## १५ ऑगस्टपर्यंत काम पूर्ण करण्याचे निर्देश;पहिल्या टप्प्याचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन करण्याचा मानस









**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर येथे पूर्णत्वास येत असलेल्या अत्याधुनिक टाटा कॅन्सर हॉस्पीटलच्या बांधकामाची राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी सोमवारी (दि.२७) पाहणी केली. अद्ययावत सोयी सुविधांनी सज्ज असे १४० खाटांच्या हॉस्पीटलचे ८० टक्के कार्य पूर्ण झालेले असून उर्वरित वीस टक्के काम १५ ऑगस्टपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश ना. मुनगंटीवार यांनी यावेळी प्रशासनाला दिले.

ना. सुधीर मुनगंटीवार यांनी हॉस्पीटलमधील बांधकामाचा आढावा घेतला तसेच काही सूचना देखील केल्या. या सूचनांवर अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात एक समिती देखील नेमण्याचे त्यांनी निर्देश दिले. बांधकामाचा पाठपुरावा करून येत्या १५ ऑगस्टपर्यंत हॉस्पीटलच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन व्हावे यादृष्टीने देखील पाठपुरावा करण्याची जबाबदारी समितीकडे असणार आहे. १५ ऑगस्ट अथवा त्या लगतच्या तारखेला देशगौरव पंतप्रधान श नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि रतन टाटा यांच्या विशेष उपस्थितीत टाटा कॅन्सर हॉस्पीटलच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन करण्याचा मानस ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.

याप्रसंगी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, माजी नगरसेवक सुभाष कासनगोट्टूवार, संजय कंचर्लावार, भाजपा नेते नामदेव डाहुले, डॉ.मंगेश गुलवाडे, धनराज कोवे, कमिशनिंग अँड इम्प्लिमेंटेशन प्रमुख डॉ. राकेश कपुरिया, प्रकल्प व्यवस्थापक वैभव गौतम, प्रकल्प समन्वयक श्रवण येगिनवार, वित्त आणि लेखा व्यवस्थापक मयूर नंधा, एमईपी व्यवस्थापक राकेश नायक, पीएमसी प्रमुख हाफीज शेख आदींची उपस्थिती होती. टाटा समुहाचे सर्वेसर्वा रतन टाटा यांच्याद्वारे २०१६ मध्ये बांबू रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटरकरिता सहकार्य लाभले यादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मतदारसंघ वाराणसी येथे टाटा कॅन्सर हॉस्पीटल बांधण्याची घोषणा झाली होती. यानंतर ना. सुधीर मुनगंटीवार यांनी रतन टाटांना चंद्रपुरमध्येही टाटा कॅन्सर हॉस्पीटल तयार व्हावे, यासाठी विनंती केली होती. टाटा यांनी त्यासाठी देखील पुढाकार घेत कॅन्सर हॉस्पीटलकरिता १०० कोटी रुपयांचा सीएसआर निधी देण्याचे कबूल केले होते. त्यांच्या पुढाकारामुळे आता चंद्रपूरमध्ये १४० खाटांचे टाटा कॅन्सर हॉस्पीटल तयार होत आहे. याकरिता राज्य शासन आणि टाटा कॅन्सर हॉस्पीटल असे संयुक्त ट्रस्ट निर्माण करण्यात आले आहे. हॉस्पीटलचे ८० टक्के काम पूर्णत्वास आले आहे. कोवीड काळात २ वर्षे ८ महिने भारतीय जनता पार्टीचे सरकार नसल्यामुळे या कामाची गती अतिशय मंद झाली होती. पण आता कामाला गती मिळालेली असून उर्वरित काम लवकरच पूर्ण होणार आहे. कॅन्सर हॉस्पिटल २लाख ३४ हजार १४ स्केअर फुटात वसलेले आहे.चंद्रपूरचे १४० खाटांची क्षमता असलेले टाटा कॅन्सर हॉस्पीटल अतिशय अत्याधुनिक असून यामध्ये उत्तम सेवा उपलब्ध आहेत. या हॉस्पीटलचा उपयोग हा तेलंगाणा, छत्तीसगढ व महाराष्ट्राच्या मध्य भागातील कॅन्सर रुग्णांना निश्चितपणे वरदाण ठरणार आहे, असा विश्वास ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.

ना.सुधीर मुनगंटीवार यांनी टाटा कॅन्सर हॉस्पीटलच्या यावेळी संपूर्ण कामासंदर्भात आढावा घेतला .हॉस्पीटलमधील डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांच्या निवासाच्या बांधकामासंदर्भात यंत्रणेची संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. याशिवाय हॉस्पीटलच्या पोच मार्गावरील अतिक्रमण काढणे, पथदिव्यांची व्यवस्था अद्ययावत करणे, नवे पथदिवे लावणे, सुरळीत वाहतुकीच्या दृष्टीने रस्ता साफ करणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि टाटा कॅन्सर हॉस्पीटलकडे जाणाऱ्या मार्गांवर मोठे दिशादर्शक फलक लावणे, हॉस्पीटलच्या आवारात अद्ययावत कॅन्टीन,सोलर,मेडिकल, पार्कींग, एटीएम आदींची सर्व सुविधा करणे, परिसरात नेहमी स्वच्छता, पिण्याचे पाणी यादृष्टीने नियोजन करणे, परिसरात पर्यावरणाच्या दृष्टीने वड,पिंपळ,कडूनिंब,औदुंबर,देशी आंबा,गुलमोहर आदी झाडांचे वृक्षलागवड करणे आदींबाबत देखील ना.मुनगंटीवार यांनी निर्देश दिले.

# अरविंद विद्यानिकेतन चा निकाल शंभर टक्के




**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा येथील अरविंद विद्यानिकेतन चा यावर्षीचा निकाल शंभर टक्के लागलेला आहे. यश चौधरी यांनी ९१.४० टक्के गुण मिळवत शाळेतून प्रथम आला आहे. जानवी तुराळे हिने ९०.८० टक्के गुण प्राप्त करून शाळेतून द्वितीय क्रमांक पटकावला आहे तर तृतीय क्रमांकावर कुमारी प्राची वंजारी ८७.६० टक्के आहे. अफिया मलिक हिने ८७.४० टक्के घेत चतुर्थ क्रमांकावर आलेली आहे. संस्थेचे अध्यक्ष स्वान यांनी या शाळेचा नेहमी शंभर टक्के निकालाची परंपरा राहील अशी ग्वाही दिली आहे. संस्थेचे अध्यक्ष ,उपाध्यक्ष ,सचिव, कोषाध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक गणं यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# ओम ओबीलवारने ८६% गुण घेत मिळवले दहावीत सुयश

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली येथील नामांकित गोंडवाना सैनिकी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय गडचिरोली येथील विद्यार्थी ओम अजय ओबिलवारणे ८६ टक्के गुण घेत घवघवीत यश मिळवले आहे.

ओम ओबीलवार हा सावली तालुक्याच्या शेवटच्या टोकावरील साखरी लोंडोली येथील विद्यार्थी अतिदूर्गम असे गाव गावात शैक्षणिक सुविधा नाही मात्र शिकण्याची आवड असल्याने थेट गडचिरोली गाठली कुटुंबापासून दूर राहून जिद्दीने परिश्रम घेत घवघवीत त्याने यश मिळवले.ओमने मिळवलेल्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. नुकताच लागलेल्या निकालात गडचिरोली येथील गोंडवाना सैनिकी विद्यालयाचे ८



विद्यार्थी ८० टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले.उत्कृष्ट निकालाची परंपरा राखत यंदाही गोंडवाना सैनिकी विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला हे विशेष .

# बल्लारपूर पब्लिक स्कूल मूल येथे गुणवंत विद्यार्थांचा सत्कार

**मूल । प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ मूल द्वारा संचालित बल्लारपूर पब्लिक स्कूल मूल हे विद्यालय दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२४ मध्ये १०० टक्के लागला निकालाची परंपरा कायम ठेवलेली असून २८ मे ला विद्यालयातील गुणवंत विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला.

तसेच या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव ड.अनिल वैरागडे तसेच कार्यक्रमचे विशेष अतिथी म्हणून अशोक झाडे प्राचार्य नवभारत विद्यालय मूल व शाळेचे प्राचार्य विनोद बोलीवार हे उपस्थित होते. विद्यालयामधून प्रथम क्रमांक कुमार गितेश प्रदीप गावतुरे ९२.४० टक्के, तसेच द्वितीय क्रमांक कुमारी नंदिनी रुपेश रामगिरवार ९२.०० टक्के तर कु. अर्पिता अशोक वाळके ९१.४० टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच विद्यालयातील संपूर्ण विद्यार्थांना शाळेचे प्राचार्य विनोद यांनी विद्यार्थी व पालकांना मोलाचं मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व तसेच मान्यवारांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तोषी जयस्वाल यांनी केले व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु रुहीना सय्यद यांनी केले कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे शिक्षक, शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# महात्मा फुले विद्यालय चर्हाटा शाळेचा दहावीचा निकाल ९८ टक्के

**पाटोदा । प्रतिनिधी**

भगवान विद्या प्रसारक मंडळ संचलित महात्मा फुले मा. विद्यालय, चर्हाटा शाळेचा निकाल ९८% लागला परीक्षेस बसलेल्या एकुण ४४ विद्यार्थी पैकी ४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. २८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले तर १२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण तर ३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. शाळेतुन प्रथम येण्याचा मान चि.ईंदुरे वैष्णव ओमप्रकाश-९१.६०%, द्वितीय चि.वळकर ऋषीकेश अजिनाथ ९०.६०%, तृतिय तोडेकर विशाल भिमराव तसेच ईतर सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन व पुढील शिक्षणास शुभेच्छा संस्थेचे अध्यक्ष श्री.गो.गो.मिसाळ सर, संस्था उपाध्यक्ष श्री.प्रकाश आण्णा सुस्कर, संस्था सचिव श्री.डॉ. अनिलकुमारजी सानप, चर्हाटा गावचे प्रथम नागरीक सरपंच श्री.विनेशजी उबाळे तसेच शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य माळी सर व सर्व शिक्षकवृंदानी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुण पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# ६ लाखांचे बक्षीस असलेल्या जहाल माओवाद्याचे आत्मसमर्पण

**गडचिरोली । प्रतिनिधी**

शासनाने जाहीर केलेल्या आत्मसमर्पण योजनेमुळे तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळून वरिष्ठ माओवाद्यांसह अनेक जहाल माओवाद्यांनी आजपर्यंत पोलीसांसमोर आत्मसमर्पण केलेले आहे. त्याचबरोबर आत्मसमर्पित माओवाद्यांचे पोलीस दलाने पुनर्वसन घडवून आणल्यामुळे आजपर्यंत एकुण ६६२ माओवाद्यांनी गडचिरोली पोलीस दलासमोर आत्मसमर्पण केले आहे. २८ मे रोजी एकुण ०६ लाख रुपये बक्षीस असलेला जहाल माओवादी नामे गणेश गट्टा पुनेम (३५) रा. बेच्चापाल, तह. भैरमगड, जि. बिजापूर (छ.ग.) याने सीआरपीएफचे पोलीस उप- महानिरीक्षक जगदीश मीणा यांच्या समोर आत्मसमर्पण केले त्यानंतर त्यांनी त्याचे हस्तांतरण गडचिरोली पोलीस दलाकडे केले.

गणेश पुनेम हा २०१७ मध्ये सप्लाय टिम (भैरमगड एरीया) दलममध्ये सदस्य पदावर भरती होऊन जानेवारी २०१८ पर्यंत कार्यरत होता. २०१८ मध्ये सप्लाय टिममध्ये उप-कमांडर पदावर बढती झाली.

सन २०१८ पासुन आतापर्यंत सप्लाय टिम उप-कमांडर (भैरमगड एरीया) पदावर कार्यरत होता.त्याचा



सन २०१७ मध्ये मौजा मिरतूर, जि. बिजापूर (छ.ग.) जंगल परिसरात झालेल्या चकमकीमध्ये व सन २०२२ मध्ये मौजा तिम्मेनार जि. बिजापूर (छ.ग.) जंगल परिसरात झालेल्या चकमकीमध्ये सहभाग होता.माओवादी दलममध्ये अहोरात्र भटकंतीचे जीवन असून, स्वतःच्या आरोग्याविषयी समस्या उद्भवल्यास त्याकडे काळजीपुर्वक लक्ष दिल्या जात नाही. दलममधील वरिष्ठ कॅडरचे माओवादी सांगतात की, चळवळीकरीता/जनतेकरीता पैसे गोळा करावे लागतात. प्रत्यक्षात गोळा केलेला पैसा ते स्वतःसाठीच वापरतात. जनतेच्या विकासासाठी कधीच वापरले जात नाही. वरीष्ठ माओवादी नेते फक्त स्वतःच्या फायद्यासाठी गरीब आदिवासी युवक-युवतींचा वापर करून घेतात. दलममध्ये असतांना विवाह झाले तरीही वैवाहीक स्वतंत्र आयुष्य जगता येत नाही. गडचिरोली पोलीस दलाच्या आक्रमक माओवादविरोधी अभियानामुळे माओवादी कारवायांचे कंबरडे मोडले आहे. वरीष्ठ माओवादी नेते पोलीस खबरी असल्याच्या संशयावरून आमच्याच निष्पाप बांधवांना ठार मारायला सांगतात. यामुळे माओवादी गणेश पुनेम पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले.महाराष्ट्र शासनाने गणेश पुनेम वर ०६ लाख रूपयाचे बक्षीस जाहिर केले होते. आत्मसमर्पणानंतर पुनर्वसनाकरीता केंद्र व राज्य शासनाकडुन गणेश पुनेम याला एकुण ५ लाख रुपये बक्षीस जाहिर केले आहे.गडचिरोली पोलीस दलाने अतिशय प्रभावीपणे माओवादविरोधी अभियान राबविल्यामुळे तसेच शासनाने माओवाद्यांना आत्मसमर्पणाची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिल्याने, सन्मानाने जीवन जगण्यासाठी सन २०२२ ते २०२४ सालामध्ये आतापर्यंत एकुण १४ जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. सदर माओवाद्याचे आत्मसमर्पण घडवून मुख्यप्रवाहात आणण्याबाबतची कारवाई सीआरपीएफचे पोलीस उप-महानिरीक्षक (अभियान) जगदीश मीणा व पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली उप-कमांडण्ट सीआरपीएफ नितिन कुमार यांच्या नेतृत्वाखाली आर.एफ.टी (रेंज फिल्ड टीम) च्या पथकाकडून करण्यात आली.

# आर.के.हायस्कूल च्या गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा पालकांसह अभिनंदन सोहळा

**पुलगाव । प्रतिनिधी**

नुकताच माध्यमिक शालान्त परीक्षेचा निकाल जाहीर झाला आणि आर. के. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करीत संस्थेचा नावलौकिक कायम ठेवला.या औचित्याने शाळेच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह अभिनंदन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

शाळेचा निकाल ९६.७९ टक्के लागला. तन्मयी हितेश पैकीने ९४.४० टक्के गुण प्राप्त करून प्रथम आली. तीचे पुष्पगुच्छ ,मिठाई व आर के हायस्कूल ट्रस्टच्या वतीने चांदीचे नाणे देवून अभिनंदन करण्यात आले. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक संजय सहारे, मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव, उपमुख्याध्यापिका माया वंडलकर,उपप्राचार्य सुनील भोयर, पर्यवेक्षक गणेश इंगळे, लालबहादूर यादव व अंशतः अनुदानित विभागाचे प्रमुख जितेंद्र वर्मा उपस्थित होते. उज्वल राजेश दीडपाये ९३.४० टक्के , व कुमारी क्रांती किशोर भांगे ९२ टक्के गुणांसह यांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त




झाले. सर्व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी प्रशिक डोळस ९१.८० टक्के ,कुमारी मानसी गणेश वालदे ९१.४० टक्के,कुमारी उत्कर्षा दिनेश नगराळे ९०.४० टक्के, हिमांशू प्रकाश वडतकर ८९.२० टक्के, रा राजीव नंदेश्वर लोखंडे ८८.४० टक्के, आयुष किशोर काळे ८८.४० टक्के, प्रणित अनिल फुलकरी ८७.४० टक्के भावेश संजय महेश्कार ८७ टक्के, सय्यद अदनान सय्यद अक्सार ८६.८० टक्के यांच्या पालकांसह पुष्पगुच्छ व मिठाई देवून अभिनंदन करण्यात आले. तत्पूर्वी प्रतिमेला माल्यार्पण, दीप प्रज्वलनाने व अतिथीच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक पर्यवेक्षक लालबहादुर यादव यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक संजय सहारे यांनी उत्कृष्ट निकालाबाबत विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले तर मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव, उपमुख्याध्यापिका माया वंडलकर पर्यवेक्षक गणेश इंगळे, अंशतः अनुदानित विभागाचे प्रमुख जितेंद्र वर्मा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत समयोचित मार्गदर्शन केले. आर के हायस्कूल ट्रस्टचे अध्यक्ष हरिप्रसाद केजडीवाल, शाळा समिती अध्यक्ष रंजन बाबू केजडीवाल, ज्येष्ठ विश्वस्त द्वारकादासजी दरक यांनी सर्वच गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचे ,त्यांच्या पालकांचे व विशेषतः सर्व शिक्षकांचे कौतुक करीत अभिनंदन केले. यापुढे देखील संस्थेचा नावलौकिक कायम राहील असा विश्वास व्यक्त केला. या अभिनंदन कार्यक्रमात सर्व वर्ग-शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परीक्षा विभाग प्रमुख गणेश शर्मा यांनी केले तर आभार संजय सुपे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मतमोजणी प्रक्रियेसंदर्भात उमेदवार व राजकीय पक्षाची बैठक

## आयोगाच्या सुचनांबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी केले अवगत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी ४ जून २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, एम.आय.डी.सी. परिसर, पडोली येथे होणार आहे. या संदर्भात निवडणूक आयोगाच्या सुचनांबाबत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी उमेदवार व राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना अवगत केले. तसेच मतमोजणी केंद्रात उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी यांनाच प्रवेश राहणार असून याव्यतिरिक्त कोणालाही प्रवेश देण्यात येणार नाही, असेही जिल्हाधिका-यांनी सांगितले.

मतमोजणी प्रक्रियेसंदर्भात माहिती देण्यासाठी नियोजन सभागृह येथे राजकीय पक्षाची आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार यांच्यासह काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटीक) पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.




४ जून रोजी सकाळी ८ वाजता मतमोजणी सुरू होईल, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या समक्ष सकाळी ७ वाजता सुरक्षा कक्ष उघडण्यात येईल. तसेच मतमोजणी केंद्रात उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना सकाळी ७ वाजता प्रवेश देण्यात येणार आहे. जिल्हा कोषागार कार्यालयात असलेल्या टपाली मतपत्रिका सकाळी पोलिस बंदोबस्तात कोषागार कार्यालयातून मतमोजणी केंद्राकडे पोहचविण्यात येणार आहे. सकाळी ८ वाजता टपाली मतपत्रिका व सर्व्हिस मतदारांच्या मतपत्रिकांच्या मोजणीला सुरुवात होईल. तर प्रत्यक्ष ईव्हीएम मतमोजणी प्रक्रिया सकाळी ८.३० वाजता सुरू होणार आहे. सुरक्षा कक्ष ते मतमोजणी कक्षादरम्यान मतदान यंत्र व पाकिट क्रमांक १ यांच्या वाहतुकीबाबत व त्याचे चित्रीकरण, मतमोजणी केंद्रात प्रदर्शित करण्यात येणार असून संपूर्ण परिसर सीसीटीव्ही नियंत्रणाखाली राहणार आहे.अशा राहणार विधानसभानिहाय मतमोजणीच्या फे-या : ७०- राजुरा विधानसभा मतदारसंघात मतमोजणीच्या एकूण २४ फे-या, ७१ - चंद्रपूर मतदारसंघात २८ फे-या, ७२- बल्लारपूर करीता २६ फे-या, ७५- वरोरा करीता २५ फे-या, ७६ -वणीकरीता २५ फे-या आणि ८० - आर्णि विधानसभा मतदारसंघात मतमोजणीच्या एकूण २७ फे-या राहणार आहेत.मतमोजणी प्रतिनिधी नियुक्ती व आवश्यक कागदपत्रे : मतमोजणी प्रतिनिधीचे वय १८ वर्षे पूर्ण असावे. तसेच सदर प्रतिनिधी लोकसभा मतदारसंघातील मतदार असावा. ३१ मे २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रतिनिधींची नियुक्तीची मुदत आहे. प्रत्येक विधानसभा मतदार संघाकरीता १४ टेबलसाठी (प्रति उमेदवार) १४ प्रतिनिधी, टपाली मतमोजणीकरीता ९ प्रतिनिधी आणि सर्व्हिस मतपत्रिकाकरीता १ प्रतिनिधी. मतमोजणी प्रतिनिधींजवळ ओळखपत्र, मतमोजणी प्रतिनिधी नियुक्तीबाबत पत्राची प्रत आणि घोषणापत्र असणे आवश्यक आहे.मतमोजणी केंद्रात परवानगी असलेले साहित्य : मतमोजणी केंद्रात पेन / पेन्सील, पांढरा कागद / नोटपॅड आणि १७ - सी ची दुय्यम प्रत असणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणी केंद्रात मोबाईल किंवा कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तु नेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

# स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार तरुणांसाठी प्रेरणादायी-प्र-कुलगुरु डॉ.श्रीराम कावळे

## गोंडवाना विद्यापीठात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

आपल्या आयुष्यातील सर्वाधिक काळ ज्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कारावास भोगला, त्या स्वातंत्र्यवीर सावरकरांची महती आजच्या युवा पिढीला होणे आवश्यक आहे. अंदमानच्या कारागृहात मरणप्राय यातना भोगत असतानासुद्धा प्रचंड इच्छाशक्ती, ही त्या काळातील क्रांतीकारकांना प्रेरणा देणारी होती. त्याचप्रमाणे त्यांचे विचार तरुणांसाठी प्रेरणादायी असल्याचे विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे म्हणाले.



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी इग्रंजी विभागाचे प्रमुख डॉ. विवेक जोशी, प्रा. डॉ. प्रिया गेडाम, प्रा. अतुल गावस्कर, परिक्षा व मुल्यमापन विभागाचे संचालक दिनेश नरोटे, अधिक्षक डॉ. सुभाष देशमुख, सिस्टीम नालिस्ट अमोल खोडवे, योगेश चरडे आदी उपस्थित होते.

# स्वातंत्र्यवीर वी दा सावरकर शिक्षक फाउंडेशनच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**मूल । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर वी दा सावरकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून मुल येथील स्वातंत्र्यवीर वी दा सावरकर शिक्षक फाउंडेशन च्या वतीने नुकत्याच १० वीच्या परीक्षेत मुल तालुक्यातील प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा त्यांच्या घरी जाऊन सत्कार करण्यात आला.

अनुष्का प्रवीण ठावरी नवभारत कन्या विद्यालय, मुल ची विद्यार्थिनी ९६.२० टक्के गुण घेत तालुक्यात प्रथम, प्राची लालाजी बावणे ही सेंट अंन्स हायस्कूल, मुल ची विद्यार्थी तालुक्यात द्वितीय ९५.६० टक्के गुण, दिव्या किशोर नरड सेंट अंन्स हायस्कूल, मुल ची विद्यार्थी ही तालुकयात ९५.४० गुण घेत तृतीय आली या सर्व विद्यार्थ्यांना



पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या पालकांसोबत सत्कार करण्यात आला, सोबतच फाउंडेशन च्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्याच्या शुभेच्छा देत मार्गदर्शन केले, फाउंडेशन च्या अध्यक्षा प्रा डॉ किरण कापगते(बोरकर), सचिव प्रविन मोहूरले व पदाधिकारी सर्वश्री सुखदेव चौथाले, युवराज चावरे, मधुकर शेंडे, आस्तिक मेश्राम, बबन गुंडावार, गौतमी गेडाम(नखाते), सुनीता श्रीवास्तव व इतर पदाधिकारी उपस्थित होते.




**नागभीड तालुक्यातील मिंडाळा- बाळापूर रस्त्यावर सिंधीच्या वृक्षाला सिंदोऱ्या लागून पिकल्या आहेत.आरोग्यासाठी फारच चांगल्या असुन या राणमेव्याची चव ये जा करणाऱ्याना आकर्षित करत आहे. छाया :प्रणय बांगरे.**

# भाजपा व अन्य सामाजिक संघटनाव्दारे स्वातंत्र्यवीर सावरकरांना जयंतीनिमित्त अभिवादन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्य समरातील धगधगते अग्निकुंड स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती चंद्रपूर महानगरातील स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात भाजपा व अन्य सामाजिक संघटनांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे साजरी करण्यात आली.

पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हसंराज अहीर यांच्या मार्गदर्शनात शहरातील बस स्टॅन्ड परिसरातील सावरकरांच्या स्मृतीस्थळावर हा जयंत्योत्सव साजरा करण्यात आला. या प्रसंगी भाजपा नेते खुशाल बोंडे, माजी महापौर अंजली घोटेकर, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, कमल स्पोर्टींग क्लब चे जिल्हाध्यक्ष रघुवीर अहीर, माजी नगरसेविका मायाताई उईके, चंद्रकला सोयाम, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सदस्य विनोद शेरकी, प्रमोद



शास्त्रकार, वंदना संतोषवार, गिरिष अणे, प्रकाश आवळे यांचेसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सुरुवातीला स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या तैलचित्रास माल्यार्पण करुन त्यांच्या स्मृतीस उपस्थितांनी अभिवादन केले. यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर मंचाचे प्रकाश आवळे यांनी आपल्या प्रास्ताविकात सावरकरांच्या देशाच्या स्वातंत्र्य संग्रामातील त्याग व कार्याचा गौरवपूर्ण शब्दांमध्ये परिचय करुन दिला. माजी महापौर अंजली घोटेकर यांनी सावरकरांनी मातृभुमीसाठी काळ्या पाण्याची शिक्षा तर भोगलीच परंतु भारतीयांच्या मनामनामध्ये स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग चेतविण्यासाठी आपल्या धारदार लेखणीतून स्वातंत्र्य लढ्याला नवे आयाम देवून लोकांमध्ये प्रेरणा प्रसवली त्यांचे योगदान अभुतपूर्व असून त्यांच्या कार्यातून सर्वांनी प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले. या जंयती उत्सवात रमेश भुते, विठ्ठल डुकरे, दिनकर सोमलकर, राजेंद्र खांडेकर, दिवाकर पुद्दटवार, प्रदिप किरमे, गौतम यादव, श्रीकांत भोयर, बि.बि.सिंह, संयज खनके, शषिकांत म्हस्के, तुषार मोहुर्ले, राजेश वाकोडे, राजु वेलंकीवार, रवि येणारकर, देवानंद साखरकर, तुषार मोहुर्ले, प्रकाश ताठे, मुग्धा खांडे, मयुर भोकरे, विशाल गिरी, गिता महाकुळकर, गुरुदास मंगर, हेमंत डहाळे, गंगाधर कुंटावार, अरुणा चौधरी, शालु वासमवार, स्मिता श्रीगडीवार, वाणी राव, अक्षय ठक्कर यांचेसह अनेक सावरकर प्रेमींची उपस्थिती होती.

# व्यवसाय करतांना नियमांचे काटेकोरपणे पालन करा-जिल्हाधिकारी विनय गौडा

## अनुज्ञप्ती परवानाधारकांसोबत जिल्हा प्रशासनाचा संवाद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अनुज्ञप्तीचा परवाना देतांनाच शासनाने अटी व शर्तीसुध्दा घालून दिल्या आहेत. आपल्या व्यवसायामुळे इतरांना त्रास होईल, अशी कृती न करता परवानाधारकांनी नियमानुसारच वागणे अपेक्षित आहे. त्यामुळे शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करा, नियमांचे उल्लंघन किंवा अवैध व्यवसाय करणा-यांविरुध्द सक्त कारवाई करण्यात येईल, असे मत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी व्यक्त केले. जिल्हा प्रशासन, पोलिस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात अनुज्ञप्ती परवानाधारकांसोबत संवाद साधतांना ते बोलत होते. बैठकीला जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुभाष पवार, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक सुरजकुमार रामोड उपस्थित होते.



अनुज्ञप्ती विक्री, वाहतूक व साठवणूक संदर्भात कायद्याचे पालन होणे आवश्यक आहे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, कुठेही नियमांचे उल्लंघन आढळले तर कारवाईसाठी तुम्हीच जबाबदार रहाल. नियमांचे गांभिर्य समजावून सांगण्यासाठी आजच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. दुकानदारांनी दर्शनी भागात कमाल, किरकोळ विक्री व वेळेबाबतचा फलक लावावा. तसेच नोकरनामा, आवश्यक अभिलेख, स्टॉक रजिस्टर अपडेट ठेवा. ज्या दिवशीचे रजिस्टर त्याच दिवशी भरून पूर्ण करा. जेणेकरून कोणत्याही वेळेस प्रशासनाकडून पडताळणी झाली तर अडचण होणार नाही.

अनुज्ञप्ती विक्री संदर्भात नियमानुसार दिलेल्या वेळा गांभिर्याने पाळा. ज्या परवानाधारकांकडे सीसीटीव्ही नाही, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. महाराष्ट्रात २१ वर्षांखालील नागरिकांना मद्यविक्री करता येत नाही. २१ ते २५ वयोगटातील नागरिकांना सौम्य मद्यविक्री तर २५ वर्षांवरील नागरिकांना सर्व प्रकारची मद्यविक्री करता येते. त्यामुळे खरेदीदाराच्या ओळखपत्रावरुन वयाची पडताळणी करूनच मद्य विक्री करा. अन्यथा विनाकारण एखादी घटना घडली तर त्यात तुम्हीसुध्दा अडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या गोष्टीकडे गांभिर्याने लक्ष द्या. दुकानावर असलेल्या इतर कामगारांनासुध्दा सर्व नियमांची माहिती असणे आवश्यक आहे. अवैध व्यवसाय करणा-यांची माहिती प्रशासनाकडे द्या व स्वत:चा व्यवसाय नियमानुसार करा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी केले.

**पैसे कमाविण्याच्या नादात कायद्याच्या कचाट्यात अडकू नका : एसपी सुदर्शन**

अटी व शर्तीनुसारच अनुज्ञप्ती परवानाधारकांनी व्यवसाय करावा. अवैध व्यवसाय करणा-यांवर प्रशासनातर्फे नियमित कारवाई सुरूच आहे. याव्यतिरिक्त अवैध विक्रीबाबत काही माहिती असल्यास पोलिस प्रशासनाला त्वरीत कळवा. नियमांचे उल्लंघन करून पैसे कमावण्याच्या नादात विनाकारण कायद्याच्या कचाट्यात अडकू नका,असे जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन म्हणाले.

**ठरवून दिलेल्या नियमानुसार आपली दुकाने वेळेवर सुरु करा व वेळेवर बंद करा. 'दारू पिऊन गाडी चालवू नये' अशा आशयाचे फलक आपल्या दुकानांसमोर लावा. राज्यातील इतर घटनांची चंद्रपूरमध्ये पुनरावृत्ती होऊ नये म्हणून नियमांचे पालन करण्यासंदर्भात ही बैठक बोलाविण्यात आली आहे. असामाजिक तत्वांकडून त्रास होत असे, दारूकरीता कोणी जबरदस्ती करीत असेल तर पोलिस विभागाला कळवा किंवा ११२ क्रमांकावर थेट कॉल करा, पोलिसांकडून नक्कीच कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही सुदर्शन यांनी दिली.**

# मतमोजणी केंद्राच्या परिसरात कलम १४४ लागू

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

१३-चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातील मतमोजणीची प्रक्रिया महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पडोली येथे दिनांक ४ जून २०२४ रोजी पार पाडली जाणार असून मतमोजणीच्या प्रक्रियेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचे दृष्टीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चे २ ) मधील कलम १४४ व १४४(१)(३) लागू करण्यात आले आहे. मतमोजणी केंद्राच्या परिसरात ४ जून रोजी सकाळी ६ वाजतापासून मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खालील बाबी करण्यास जिल्हाधिका-यांच्या आदेशान्वये प्रतिबंध करण्यात आला आहे. मतमोजणी केंद्राच्या बाहेरील १०० मीटर परीसरात सर्व प्रकारच्या वाहतुकीस प्रतिबंध असेल तसेच मतमोजणी केंद्राचे बाहेरील १०० मीटर परीसरातील सर्व दुकाने / आस्थापना व्यवसाय केंद्र बंद राहतील. मतमोजणी केंद्राचे परीसरात मतमोजणी कामावर नेमणुक झालेल्या अधिकारी व कर्मचा-यांकरीता वाहनतळाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मतमोजणी करीता नियुक्ती झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांची वाहने, पोलीस विभाग, विद्युत विभाग,अग्नीशमन विभाग व सुरक्षा व्यवस्थेकरीता असलेली वाहने यांनाच प्रवेश राहील. इतर सर्व प्रकारच्या वाहनांस प्रतिबंध असेल.

भारत निवडणूक आयोगाचे वतीने वितरीत केलेल्या अधिकृत ओळखपत्राशिवाय इतर व्यक्तिंना मतमोजणी परिसरात प्रवेश प्रतिबंध असेल. मतमोजणीच्या दिवशी केंद्राच्या बाहेरील १०० मीटर परिसरात २ किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती समुहात जमा होण्यास प्रतिबंध असेल. उमेदवार व पत्रकार यांना ठरवून दिलेल्या बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे संपर्क साधण्यासाठी मोबाईल फोनचा वापर करता येईल. परंतू प्रत्यक्ष मतमोजणी कक्षात मोबाईल फोन वा कोणतेही इलेक्ट्रॉनिक गॅजेट नेण्यास/ वापरण्यास प्रतिबंध असेल. मतमोजणी केंद्र महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पडोलीच्या सभोवताल १कि.मी. चे क्षेत्रात /परिसरात ड्रोन वा ड्रोन सदृश्य वस्तु (ऋश्रूळपस जलक्षशर्ली) उडविण्यास ४ जून २०२४ रोजी सकाळी ६ वाजतापासून मतमोजणी संपूर्ण प्रक्रिया संपेपर्यंत प्रतिबंध असेल, असे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या आदेशात नमुद आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .